दि. ०२.०२.२००९ रोजीच्या अधिसूचनेन्वये वैद्यकीय अधिकारी, गट-अ या पदावर समावेशन झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मा.मॅट, मुंबई) आदेशानुसार अस्थायी सेवा कालावधीतील लाभ मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः मवैअ-२०२२/प्र.क्र. ६४४/सेवा-३
दहावा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केट जवळ,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय,मुंबई- ४०० ००१.
दिनांक:- ०८ नोव्हेंबर, २०२३

**वाचा :-**

१) शासन अधिसूचना क्र. मवैअ-१००८/२०४/प्र.क्र. ११६/सेवा-३, दि. ०२.०२.२००९
२) मुळ अर्ज क्र. २४२/०९ व इतर अर्ज मधील मा. मॅट, मुंबई यांचे आदेश दि. ०२.०५.२०१६

**प्रस्तावना :-**

सन २००५ पुर्वी नियमित पदावर अस्थायी सेवेत कार्यरत असलेल्या व दि.०२.०२.२००९ रोजीच्या अधिसूचनेन्वये नियमित सेवेत समावेशन झालेल्या वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मा. मॅट, मुंबई) यांच्या आदेशानुसार अस्थायी सेवा कालावधीतील सेवा अर्जित रजा व वेतनवाढीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई मधील रिट याचिका क्र. २३०३/२०१९, महाराष्ट्र शासन विरूद्ध डॉ.राजेश गायकवाड व इतर ही याचिका मागे घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त याचिकेतील सन २००५ पुर्वी नियमित पदावर अस्थायी सेवेत कार्यरत असलेल्या व दि.०२.०२.२००९ रोजीच्या अधिसूचनेन्वये (सन २००९ व सन २०१० अशा दोन टप्प्यात) नियमित सेवेत समावेशन झालेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मा. मॅट, मुंबई) यांच्या आदेशानुसार नियमित पदावर केलेल्या अस्थायी सेवेच्या कालावधीतील तांत्रिक खंड अर्जित रजेमध्ये रुपांतरीत करुन सदर सेवा कालावधीतील अर्जित रजा व वार्षिक वेतनवाढी मंजूर करुन सदरचे वैद्यकीय अधिकारी समावेशनापूर्वी नियमित पदावर ज्या तारखेला अस्थायी स्वरुपात सेवेमध्ये प्रथमत: हजर झाले त्या तारखेपासून आजपावेतोची वेतननिश्चिती करण्यास सदर शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

३. तसेच विधि व न्याय विभागाच्या दि.२८.०२.२०१७ च्या परिपत्रकातील तत्व/निर्देश दि.०२.०२.२००९ रोजीच्या अधिसूचनेन्वये (सन २००९ व सन २०१० अशा दोन टप्प्यात) समावेशन झालेल्या उर्वरित वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२०) यांना लागू करण्यात येऊन त्यांचे देखील नियमित पदावर केलेल्या अस्थायी सेवेच्या कालावधीतील तांत्रिक खंड अर्जित रजेमध्ये रुपांतरीत करुन सदर सेवा कालावधीतील अर्जित रजा व वार्षिक वेतनवाढी मंजूर करुन सदरचे वैद्यकीय अधिकारी समावेशनापूर्वी नियमित पदावर ज्या तारखेला अस्थायी स्वरुपात सेवेमध्ये प्रथमत: हजर झाले त्या तारखेपासून आजपावेतोची वेतननिश्चिती करण्यास सदर शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. संदर्भ क्र.१ येथील दि.०२.०२.२००९ रोजीच्या अधिसूचनेन्वये (सन २००९ व सन २०१० अशा दोन टप्प्यात) समावेशन झालेले सर्व वैद्यकीय अधिकारी, गट-अ हे समावेशनापुर्वी नियमित पदावर ज्या तारखेला अस्थायी स्वरूपात सेवेमध्ये प्रथमत: हजर झाले त्या तारखेपासून आजपावेतोची वेतननिश्चितीचा स्वयंपूर्ण / परिपूर्ण प्रस्ताव संबंधित कार्यालय प्रमुखांनी मूळ रेकॉर्डसह विभागास मान्यतेस्तव सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३११०८१३१७४७४८१७ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MILIND JAYANT MHAISKAR

Digitally signed by MILIND JAYANT MHAISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT, 2.5.4.20=2473caf1bd0740c3ed232022f23f47e94b26499e78b90ecc6269a55b7bd8b843, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9DC747A68267C14C9BD05A4A7749ABC36E7A3D550985715397F1DB0FAF493D82, cn=MILIND JAYANT MHAISKAR
Date: 2023.11.08 13:24:27 +05'30'

(मिलिंद म्हैसकर)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल, लेखापरीक्षा- १, महाराष्ट्र, मुंबई.
७) महालेखापाल, लेखापरीक्षा- २, महाराष्ट्र, नागपूर.
८) आयुक्त, आरोग्य सेवा व कु.क.तथा संचालक, रा.आ.अ, आरोग्य भवन,मुंबई.
९) संचालक १/२, आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, मुंबई/पुणे
१०) उपसंचालक , आरोग्य सेवा (सर्व परिमंडळे)